# मालवण कांदळगाव दौरा २०२६













वर्ष २०२५ मध्ये श्री निसर्गदत्त समाधी चॅरीटेबल ट्रस्ट, मुंबई स्थापन झाला. श्री निसर्गदत्त समाधी चॅरीटेबल ट्रस्टची उद्दिष्टे पूर्ण करण्याचा एक प्रयत्न म्हणून श्री निसर्गदत्त महाराजांचे प्राथमिक शिक्षण मालवण, कांदळगाव येथील ज्या जिल्हा परिषद शाळा क्रमांक १ मध्ये झाले ती शाळा जून १८७१ साली स्थापन झाली. ही घटना लक्षात घेऊन या प्रयत्नाचा शुभारंभ या शाळेपासून करण्यात आला. कांदळगाव(मालवण) आणि परिसरातले असे सध्या तिथे एकूण ३०/३५ विद्यार्थी शिकतात. इयत्ता पाचवीपर्यंतचे शिक्षण या शाळेमार्फत मुलांना उपलब्ध आहे. नव्या युगाची आवश्यकता म्हणून शाळेत संगणक रूम आहे. अभ्यासासाठी एक संगणक आणि प्रोजेक्टर यांची आवश्यकता आहे असे मुख्याध्यापिकाकडून समजले. त्याप्रमाणे एक आधुनिक संगणक, सोबत प्रोजेक्टर आणि त्याची स्क्रीन अशा तीन वस्तू भेट म्हणून देण्यासाठी ट्रस्टने एक कार्यक्रम श्री निसर्गदत्त महाराज भक्ती ज्ञान केंद्र कांदळगावच्या सहयोगाने आखला.

श्री निसर्गदत्त समाधी ट्रस्टचे पदाधिकारी आणि काही गुरुबंधुभगीनी या कार्यक्रमात सहभागी झाले. सदर कार्यक्रमाचा संपूर्ण खर्च सेवा म्हणून एका सद्गुरू भक्ताने आवश्यक रक्कम ट्रस्टकडे जमा केली.





शनिवार दिनांक २१ मार्च २०२६ रोजी **कांदळगाव (मालवण) येथील श्री निसर्गदत्त भक्ती ज्ञान केंद्र** येथे सकाळी १०.३० वाजता हा कार्यक्रम संपन्न झाला. सांप्रदायिक परंपरेप्रमाणे प्रारंभी मठात सद्गुरूंची पूजा-आरती झाली. मठाचे अध्यक्ष ज्येष्ठ गुरुबंधू मा.श्री जयप्रकाश खोत केंद्र आवर्जून हजर होते. कांदळगावचे सरपंच मा. श्री रणजीत परब, कांदळगाव शाळा केंद्राचे प्रमुख श्री पारकर, मुख्याध्यापिका श्रीमती संध्या मेथर, स्थानिक पालक उपस्थित होते. ट्रस्टच्या अध्यक्षा सौ. उषा कामत यांनी गुलाब पुष्प देऊन सर्वांचे स्वागत केले. मान्यवरांच्या उपस्थितीत मा. श्री जयप्रकाश खोत आणि सौ. उषा कामत यांच्या शुभहस्ते शाळेला भेटवस्तू प्रदान



करण्यात आल्या. मान्यवरांनी याप्रसंगी आपले मनोगत थोडक्यात व्यक्त केले. *



सत्तावीस वर्षांपूर्वी अत्यंत प्रतिकूल परिस्थिती आणि अडचणी यांनी विचलित न होता ज्येष्ठ गुरुबंधू आणि बागायत मसुरे या जवळच्या गावात वास्तव करणारे श्री जयप्रकाश खोत यांनी सेवाभावाने निसर्गदत्त भक्ती ज्ञान केंद्र स्वखर्चाने उभारले. या ट्रस्टच्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून त्यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली.



याच कार्यक्रमाचा पुढील भाग म्हणून शाळेतर्फे एका हृद्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. समाधी ट्रस्टच्या अध्यक्षा सौ. उषा कामत आणि भक्ती केंद्र अध्यक्ष श्री जयप्रकाश खोत यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

शाळेची मुले, सर्व उपस्थित, रहिवासी यांना महाराजांची थोडी माहिती मिळावी या प्रोजेक्टरच्या सहाय्याने एक व्हिडीओ क्लिप सर्वांना दाखविण्यात आली. ट्रस्टने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले.




सर्व पहिली ते चौथी इयत्तेच्या सर्वमुलांनी उपस्थित मान्यवर आणि समाधीत ट्रस्टच्या सदस्यांसमोर समूह गायनाची आकर्षक कला सादर करून सर्वांची शाबासकी मिळवली. या समूह गायनासाठी केंद्रात या शाळेने स्पर्धेत पहिला क्रमांक पटकावला होता. शंभर वर्षे या जुन्या शाळेच्या इतिहासात एका शिक्षकाने(श्री पाटील सर) आदर्श शिक्षक म्हणून राष्ट्रपती पदक मिळविले होते हे ही या शाळेचे वैशिष्ठ्य!





जिल्हा परिषदेच्या शाळेत प्राथमिक शिक्षण घेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गेली चार वर्षे काही उपयुक्त वस्तू वाटप करून मदत देतात ते मुंबईचे श्री मुंजे यांची आई पण या शाळेत शिकली होती. त्याचे स्मरण ठेवून मुंजेसाहेब प्रतिवर्षी मदत करतात. योगायोगाने ट्रस्टच्या कार्यक्रम प्रसंगी ते पण उपस्थित होते.

आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. आठवणी जपण्यासाठीसाठी उत्स्फूर्त फोटो सेशन झाले.




या कोकण दौ-यात महाराजांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली काही अन्य ठिकाणे, तसेच ज्येष्ठ गुरुबंधू श्री गोगटे यांच्या आठवणी संदर्भात काही स्थळांचे पण ट्रस्टच्या सदस्यांनी दर्शन घेतले.




***कांदळगावहून मालवणला परत जाताना दहा मिनिटांवर ओझर येथे ब्रह्मानंद स्वामी यांनी साधना केलेली प्राचीन गुहा आहे. गुहेत त्यांनी दीर्घ काळ वास्तव्य केले होते. श्री निसर्गदत्त महाराज कोकण दौऱ्यावर येत त्यावेळी ते या गुहेत स्वामींची भेट घेत. जवळच्या चहाच्या दुकानातून महाराजांसाठी स्वामी चहा मागवत. शिष्य श्री गोगटे माहिती सांगत. दोघांची अध्यात्मिक चर्चा पण गुहेत होत असे.***

**(डावीकडून श्री महाराजांची नात सविता, स्नेहा धोत्रे, अनिल चुबे, ॲड. सुपर्णाराज धोत्रे, महाराजांचा पणतू जय केसरकर)**




I AM That **चे मराठीत "सुखसंवाद" असे भाषांतरीत पुस्तक महाराजांच्या सूचनेनुसार ज्यांनी केले ते श्री श्रीकांत गोगटे मालवणात धुरीवाडा बोर्डिंग–ग्राउंड जवळ या चाळीत(उजवीकडून पहिली खोली) राहत होते ती जुनी चाळ.**

**(गोगटे यांची चाळीतील उजवीकडून पहिली खोली, ॲडव्होकेट सुपर्णाराज धोत्रे, अनिल चुबे)**



या चाळीजवळच पाच मिनिटांवर श्री चुबे यांचे  घर होते. मराठी भाषांतर काम  चालू असताना चुबे यांच्या  घरी रविवारच्या बैठकीत मराठी कच्ची भाषांतरे व चर्चेसाठी  येत असत. १९७८ जानेवारी महिन्यात या घरातच रामनवमी दिवशी सद्गुरू भाऊसाहेब महराज जयंती उत्सव श्री निसर्गदत्त महाराजांच्या उपस्थिती साजरा झाला. महाराजांचे गुरुबंधू श्री भाईनाथ  महाराज, श्री तुकाराम महाराज, शिष्य वर्गा पैकी श्री हाटे साहेब,  श्री धोत्रे बंधू, महाराजांचे कुटुंबीय, शांतीताई सावंत आदि अनेक मंडळी राहून गेली. घरासमोरच्या वाळूत महाराजांची तसेच भाईनाथ महाराजांची नातवंडे खेळून गेली. १९७८ चा महाराजांचा हा अखेरचा कोकण दौरा ठरला.





२.अलिकडे शासनाने शिवरायांचा भव्य आकर्षक पूर्णाकृती पुतळा राजकोट भागात उभा केला आहे.  श्री श्रीकांत गोगटे यांच्या गोष्टी ऐकत असताना राजकोट संदर्भात त्यांनी सांगितलेली एक आठवण म्हणजे मालवणच्या पोस्ट ऑफिसमध्ये ते नोकरीला होते. संध्याकाळी ऑफीस सुटलं की ते या राजकोट भागात येऊन ते तासन तास ध्यान साधना करत. काही वेळा खूप रात्र होत आली की पोलीस येऊन त्यांना घरी जायला भाग पाडत. त्या काळी राजकोट भागात भीतीदायक घटना तेथे घडत असत असे ऐकिवात होते. म्हणून तिन्ही सांजेनंतर लोक तिकडे जायला घाबरत.





३.कोकणातील हल्ली लोकप्रिय धार्मिक स्थळ म्हणजे आंगणेवाडीची भराडी देवी  मंदिर. मालवणहून आडारीमार्गे जाताना एक छोटा पूल लागतो. श्री दीपक बागवे, खजिनदार, निसर्गदत्त भक्ती ज्ञान केंद्र, कांदळगाव ,मालवण यांच्याकडून  मिळालेल्या माहितीनुसार या पुलाचा पायाभरणी समारंभ महाराजांच्या शुभ हस्ते झाला होता. त्या पुलावर थोडा वेळ थांबून महाराजांना सर्वांनी वंदन केले.बाजूच्या खालील फोटोमध्ये आमची बस त्या पुलावरून जातानाचे वेळी फोटो घेतला.  त्यावेळी महाराजांचे स्मरण केले गेले.




धुरिवाडा सोडून 1978मध्ये श्री गोगटे कुटुंब थोडे दूर मालवणला नवीन जागेत राहायला गेले. त्या जागेत मग महाराज राहत व बाकीचे आमच्या घरी. आपला  फोटो  आमच्या समवेत काढू का इथे असे घाबरत मी महाराजांना विचारले. हसून त्यांनी मान डोलावली. तो त्या जागेत महाराज आले असता काढलेला फोटो.
ही जागा पण सदस्यांना  दाखवायची होती पण वेळे अभावी दाखवता आली नाही. त्यावेळी महाराजांच्या डाव्या हाताला त्यावेळची फ्रॉकमधली सवी या कांदळगाव दौ–यात सहभागी झाली होती. सर्वात उजवीकडे श्री श्रीकांत गोगटे.

